**प्रेसनोट दिनांक - २५/०८/२०१९**

**डेक्कन पोलीस स्टेशन, पुणे शहर**

**पोलीसांच्या सतर्कतेमुळे नागरीकाचा हरवलेला मोबाईल फोन परत मिळाला.**

---

दिनांक २४/०८/२०१९ रोजी पोना ११६९श्री. चव्हाण, पोना ७४४० श्री मलगुंडे यांना प्रभात बीट मार्शल वरील दिवसपाळी कर्मचारी कर्तव्यावर असतांना कमला नेहरु भागात पेट्रोलिंग दरम्यान रोडच्या कडेला विवो कंपनीचा मोबाईल सापडला तो मोबाईल ताब्यात घेवुन त्या मोबाईल मधील फोन नंबर काढुन संपर्क करुन विचारणा केली असता त्यांनी आपले नाव सतिष देशमुख आहे असे सांगितले त्यांनी हा मोबाईल माझ्या मित्राचा म्हणजेच अमर चव्हाण वय २१ वर्षे रा. कोथरुड पुणे याचा आहे असे सांगितले. तसेच आम्ही दोघे दहिहंडी उत्सवाची तयारी करत असताना अमर चव्हाण याचा मोबाईल कमला नेहरु पार्क या भागात पडुन गहाळ झाला आहे असे सांगितले. तसेच पोलीसांनी सतिष देशमुख याला विवो कंपनीचा मोबाईल अमर चव्हाण याचा आहे का याची खात्री करण्यासाठी अमर चव्हाणला चौकीला घेऊन ये असे सांगितले. त्यानंतर अमर चव्हाण प्रभात चौकी येथे आल्यावर त्याने आपल्या विवो कंपनीच्या मोबाईलचे बील पोलीसांना दाखवले व हा मोबाईल माझाच आहे याची खात्री केली असता पोलीसांनी तो मोबाईल अमर चव्हाण याचे ताब्यात दिला. म्हणुन त्याने प्रभात बीट मार्शल वरील पोलीस कर्मचायांचे व पोलीस दलाचे आभार मानले.